**प्रेस नोट** **दिनांक०९/०३/२०१९**

## विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर

## भा.दं.वि.सं.कलम ४२० आरोपीस ताब्यात घेवुन तपासकामी त्याची ०७ दिवस पोलीस कोठडी रिमांड मिळवली

विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणे शहर,गुन्हा नोंद क्रमांक ५३४/२०१७,भा.दं.वि.सं.कलम ४०६,४२०,४६५,४६७, ४६,४७१,३४ या १३,००,००,०००/-रुपये (तेरा कोटी रुपये) बोगस कर्ज प्रकरणाचे आर्थिक फसवणुकीच्या गुन्हयाचा तपास श्री.एस.पी.कलगुटकर,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणे शहर हे करीत आहेत.

सदर गुन्हयातील पाहीजे असलेला प्रमुख आरोपी नामे रवि कुलकर्णी, वय ५४ वर्षे, व्यवसाय- कन्सलटंन्सी, रा. १२०३, एच बिल्डींग, १२ वा मजला, ट्रेझर पार्क, वाळवेकर लॉन्सजवळ, सहकारनगर, पुणे ४११००९ याने त्यांस सदर गुन्हयात अटकपुर्व जामिन मिळणेसाठी मा.जिल्हा सत्र न्यायालय,पुणे, मा.उच्च न्यायालय,मुंबई व मा.सर्वोच्च न्यायालय,दिल्ली येथे जामिन अर्ज केलेले होते. याअनुषंगाने गुन्हयाचे तपासिक अंमलदार व त्यांचे दप्तरी यांनी वेळोवेळी तपास करुन व आरोपी विरुध्द् पुरावे गोळा करुन तसेच वेळोवेळी मा.न्यायालयांत हजर राहुन नमुद आरोपीचे अटकपुर्व जामिन अर्जास विरोध केला. परिणामी सर्व मा.न्यायालयाने नमुद आरोपी रवि कुलकर्णी याचा अटकपुर्व जामिन अर्ज फेटाळलेला आहे. तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार सदर आरोपी हा दिनांक ०७/०३/२०१९ रोजी मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्रमांक ०४,पुणे यांचे न्यायालयांत हजर झाल्याने मा.न्यायालयाने त्याची न्यायालयीन कोठडीत येरवडा मध्यवर्ती कारागृहात रवानगी केलेली होती. सदरवेळी गुन्हयाचे तपासिक अंमलदार श्री.एस.पी.कलगुटकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणे शहर यांनी अतिशय मेहनत घेवुन योग्य त्या कायदेशिर प्रक्रियेचा अवलंब करुन मा.न्यायालयाकडुन सदर आरोपीस ताब्यात घेवुन तपासकामी त्याची ०७ दिवस पोलीस कोठडी रिमांड मिळविलेली असुन सद्या सदर आरोपी पोलीस कोठडीमध्ये असुन त्याचेकडे तपास चालु आहे. अशाप्रकारे विश्रामबाग पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.एस.पी.कलगुटकर व त्यांचे दप्तरी सहाय्यक पोलीस उप निरीक्षक श्री.सच्चिदानंद शंकर कुळकर्णी व पोलीस शिपाई १०४०१ श्री.शंकर वाघुले यांनी उत्कृष्ट कामगिरी केलेली आहे.

(एस.पी.कलगुटकर)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर.